# नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचा :-**

१) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दिनांक १६/११/२०११ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.८२/२०११/जा.९४८ दिनांक २३/११/२०११, ०८/१२/२०११ व २६/१२/२०११.

३) मे. साह पेट्रोलियमचे जनरल मॅनेजर श्री. मुरलीधर शानबाग, टँकर क्र. एमएच-०४-डीके-१७९४ चा मालक अलिमुद्दीन अमिनअली, विकास बल्क कॅरिअर्सचे मालक चिराग अे. शेट्टी, मे. भगवानजी झवेरचंद शाहचे मालक भगवानजी झवेरचंद शाह यांचे दि.३/०१/२०१२ रोजीचे स्वतंत्र लेखी निवेदने.

४) टँकर क्र. एमएच-०४-डीके-१७९४ चा चालक मोहम्मद हकीक अब्दुल रज्जाक खान याने दिलेला लेखी जबाब.

५) वरीष्ठ पोलिस निरीक्षक, वडाळा टी. टी. पोलिस ठाणे यांचे दिनांक ०३/०१/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त लेखी अभिवेदन.

६) ऑल इंडिया क्लिअरींग अॅन्ड फॉरवर्डींग प्रा.लि. या कंपनीचे दिनांक ०३/०१/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त लेखी निवेदन.

७) दक्षता शाखेकडून दिनांक १७/०५/२०१२ रोजी प्राप्त झालेला रासायनिक पृथ:करण अहवाल.

८) या कार्यालयाचे दिनांक १९/०६/२०१२ रोजी संचालक, न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा यांना निर्गमित केलेले पत्र.

९) संचालक, न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा यांचेकडून दिनांक ११/०७/२०१२ रोजी प्राप्त झालेला अहवाल.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.८२/२०११/जा.५८०
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई - २०.
दिनांक : २३ /०८/२०१२.

## आदेश

**(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)**

## प्रकरणाची पार्श्वभूमी :-

दिनांक ११/११/२०११ रोजी या कार्यालयाच्या फिरत्या पथकास मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार येथील अधिकारी/कर्मचारी दोन पंचासह आयमॅक्स टॉकीज, वडाळा ट्रक टर्मिनस येथे आले. संदर विभागात टेहळणी करत करत पथक पुढे पुढे जात असतांना रस्त्याच्या बाजूला एक ट्रक ट्रेलरच्या अडोशाला, एक इसम

गाडीच्या मागील बाजूस संशयास्पदरीत्या उभा असलेला काहीतरी हालचाल करत असल्याचे पथकास दिसला. त्यानुसार पथकातील अधिकाऱ्यांनी सहकाऱ्यांना व पंचाना ट्रकच्या दिशेने जाण्याची सुचना केली. त्याप्रमाणे पथकाने धावत-धावत जाऊन सदर व्यक्तीस ताब्यात घेतले. त्यावेळी टँकर क्र. एमएच-०४-डीके-१७९४ यामधून सदर इसमाने चोरीने नळ्याच्या सहाय्याने अंदाजे २२० लिटर क्षमतेच्या लोखंडी ड्रममध्ये पेट्रोलजन्य सदृश्य पदार्थ अंदाजे २०० लिटर काढले असल्याचे पथकास निदर्शनास आले.

त्यानंतर सदर इसमास अधिकाऱ्यांनी त्याचे नांव विचारले असता, त्याने त्याचे नांव हकीक खान तसेच त्याच्या वडिलांचे नांव अब्दुल रज्जाक खान असे सांगितले. पथकातील अधिकाऱ्यांनी पंचासह गाडीचे कागदपत्र, ड्रायव्हींग लायसन्स, गाडीची चावी तसेच गाडीमध्ये भरलेल्या पेट्रोलियम पदार्थाच्या चलनाबाबतचे कागदपत्र मागितले. त्यानुसार ड्रायव्हरने कागदपत्र अधिकाऱ्यांच्या ताब्यात दिले. सदर कागदपत्रामध्ये ऑल इंडिया क्लिअरींग ॲण्ड फॉरवर्डींग प्रायव्हेट लिमिटेड, पत्ता ३०२, व्यापत भवन, ४९ पी-डेमेलो रोड, कर्नाक बंदर, मुंबई ४००००९ चे चलन क्रमांक ०६३४१० दि.११/११/२०११ रोजी भरलेले हायड्रोसोल - २०० बेस ऑईल असे चलन आढळले. ते मे. शाह पेट्रोलियम लि. प्लॉट नं. ५ ते १०, शाह इंडस्ट्रीयल इस्टेट, गांव विरार, ता. वसई, जिल्हा ठाणे (महाराष्ट्र) येथे जाणार असल्याचे चलन आढळले. सदर चलन प्रमाणे गाडीमध्ये नेट वजन १८६९० असे नमूद असलेले आढळले.

टँकर क्र. एमएच-०४-डीके-१७९४ या टँकरमधून सदर इसम चोरीने हायड्रोसोल - २०० बेस ऑईल २२० लिटर क्षमतेच्या लोखंडी ड्रममध्ये काढत असल्याची अधिकाऱ्यांची तसेच उपस्थित पंचाची खात्री झाली. त्यानंतर अधिकारी वर्ग सदर कागदपत्रांची पहाणी करत असताना अधिकाऱ्यांच्या नकळत अंधाराचा फायदा घेऊन सदर व्यक्ती तेथून निघून गेली. अधिकाऱ्यांना सदर बाब लक्षात येताच अधिकाऱ्यांनी सदर व्यक्तीचा शोध आजूबाजूच्या ठिकाणी घेण्याचा प्रयत्न केला. परंतू रात्रीची वेळ व असलेला अंधार तसेच सदर विभागात पार्कींग केलेले टँकर व ट्रेलर या अडचणीमुळे सदर व्यक्ती सापडू शकली नाही. म्हणून त्यानंतर अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष सदर गाडी ताब्यात घेऊन सदर ठिकाणी पंचनामा केला.

दरम्यानच्या काळात अधिकाऱ्यांनी १०० क्रमांकावर सदर घटनेची माहिती दिली असता वडाळा ट्रक टर्मिनल पोलिस ठाणे, मुंबई ४०००३७ येथील श्री. वाय.एन. लावण, ए.एस.आय. व श्री. विलास रामचंद्र [illegible] पोलिस नाईक बक्कल क्र. २०० हे हजर झाले. पथकातील अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष सदर पोलिस अधिकाऱ्यांना घटनेची माहिती सांगून जप्त केलेल्या मुद्देमालाची माहिती दिली.

त्यानंतर सदर मुद्देमालासह अधिकारी वर्ग व पंच वडाळा ट्रक टर्मिनल पोलिस ठाणे, मुंबई - ३७ या पोलिस ठाणेकडे रवाना होऊन जप्त मुद्देमालासह हजर झाले. सदर जप्त मुद्देमाल व चालकाकडून प्राप्त झालेले गाडी संबंधीचे तसेच हायड्रोसोल २०० बेस ऑईल भरल्यासंबंधीचे कागदपत्रे, सदर चालकाचे ड्रायव्हींग लायसन्स व जप्त मुद्देमालाचा नमुना क्र. अ-३ पोलिसांच्या स्वाधीन केले. तसेच जप्त टँकर क्र. एमएच-०४-डीके-१७९४ सह त्याची चावीही पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आली.

अशाप्रकारे टँकर क्र. एमएच-०४-डीके-१७९४ चा चालक मोहम्मद हकीक अब्दुल रज्जाक खान याने कर्नाक बंदर, मुंबई येथून हायड्रोसोल २०० बेस ऑईलने भरलेला टँकर वसई येथे न नेता तो चोरी करण्याच्याच हेतूने वडाळा ट्रक टर्मिनस येथे आणून सदर टँकर मधून स्वतःच्या फायद्यासाठी २०० लिटर हायड्रोसोल २०० बेस ऑईल काढल्याची पूर्ण खात्री झाल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द १) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८, ९ तसेच २) प्रोडक्ट (मेंटेनन्स ऑफ प्रॉडक्शन स्टोरेज अँण्ड सप्लाय) ऑर्डर, १९९९ चे कलम ३, ४, ५, ६, ७ चा भंग केल्यावरुन वडाळा टी. टी. पोलिस ठाणे, वडाळा येथे स्थानिक गुन्हा नोंद क्र. ३८४/२०११, दिनांक १२/११/२०११ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच जप्त साठयातून पंचासमक्ष नमुने घेण्यात आले.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | टँकर क्र. एमएच-०४-डीके-१७९४ | १ नग | १२,००,०००/- |
| २ | उक्त टँकरमध्ये असलेले हायड्रोसोल २०० बेस ऑईल | १८४९० लि. | ९,४२,९९०/- |
| ३ | २२० लिटर क्षमतेचा लोखंडी ड्रम | १ नग | ५००/- |
| ४ | २२० लिटर क्षमतेचा लोखंडी ड्रममधील हायड्रोसोल २०० बेस ऑईल | २०० लि. | १०,२००/- |
| ५ | २० लिटर क्षमतेचा सफेद रिकामी कॅन | १ नग | ४०/- |
| ६ | प्लॅस्टिकचे नरसाळे | १ नग | ५०/- |
| ७ | प्लॅस्टिकचा २० लिटर क्षमतेचा रिकामा गोल ड्रम | १ नग | ४०/- |
| ८ | २०/२२ चा लोखंडी पाना | १ नग | ५०/- |
| ९ | लोखंडी नळ | १ नग | १००/- |
| | | एकूण | २१,५३,९७०/- |

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमल), मुंबई यांनी वाचावे क्र. १ अन्वये केलेली असून, वडाळा टी. टी. पोलिस ठाणे, वडाळा येथे स्थानिक गुन्हा नोंद क्र. ३८४/२०११, दिनांक १२/११/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेला उपरोक्त मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये ? याबाबत वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्व संबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली असून त्याकरीता या कार्यालयात दिनांक ०७/१२/२०११ रोजी सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक ०७/१२/२०११ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी अथवा आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहिले नाहीत. सबब, पुढील सुनावणी दिनांक २०/१२/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २०/१२/२०११ रोजीच्या सुनावणीसही तपासी पोलिस अधिकारी अथवा आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहिले नाहीत. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक ०३/०१/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

0004

दिनांक ०३/०१/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. साह पेट्रोलियमचे जनरल मॅनेजर श्री. मुरलीधर शानबाग, टँकर क्र. एमएच-०४-डीके-१७९४ चा मालक अलिमुद्दीन अमिनाली, मे. विकास बल्क कॅरिअर्सचे मालक विराग अे. शेट्टी, मे. भगवानजी झवेरचंद शाहचे मालक भगवानजी झवेरचंद शाह हे उपस्थित राहिले व त्यांनी त्यांचे वाचावे क्र ३ अन्वये स्वतंत्र लेखी निवेदने सादर केली. तसेच टँकर क्र. एमएच-०४-डीके-१७९४ चा चालक मोहम्मद हकीक अब्दुल रज्जाक खान याने उपस्थित राहुन वाचावे क्र. ४ अन्वये लेखी जबाब सादर केला. तथापी, सदर सुनावणीसही तपासी पोलिस अधिकारी हे उपस्थित राहिले नाहीत.

तद्नंतर दिनांक ०३/०१/२०१२ रोजी वरीष्ठ पोलिस निरीक्षक, वडाळा टी. टी. पोलिस ठाणे यांचे वाचावे क्र. ५ अन्वये लेखी अभिवेदन तसेच ऑल इंडिया क्लिअरींग अॅन्ड फॉरवर्डींग प्रा.लि. या कंपनीचे वाचावे क्र. ६ अन्वये लेखी निवेदन प्राप्त झाले.

तद्नंतर वाचावे क्र. ७ अन्वये प्राप्त झालेल्या जप्त मुद्देमालाच्या रासायनिक पृथ:करण अहवालात, Exhibit contains higher boiling petroleum hydrocarbon oil having density 0.900 at 30°C and flacsh point_162°C असे नमूद केले आहे. तथापी, प्रस्तुत प्रकरणी बिल ऑफ एन्ट्रीवरील नमूद Base Oil hydrosol 200 व पृथ:करण अहवालामधील higher boiling petroleum hydrocarbon oil हे दोन्ही द्रवपदार्थ वेगळे असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत असल्याने दोन्ही पदार्थांचे Definition व दोन्ही पदार्थांमधील फरक याबाबतचा अहवाल प्राप्त करुन घेण्यासाठी संचालक, न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा यांना वाचावे क्र. ८ अन्वये पत्र निर्गमित करण्यात आले.

तद्नंतर संचालक, न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा यांच्याकडून वाचावे क्र. ९ अन्वये प्राप्त झालेल्या अहवालात, This to inform you that the report issued by this office says that exhibit contain higher boiling petroleum hydrocarbon oil having density 0.900 at 30°C and flash point 162°C. It may be used as base oil hydrosol असे नमूद केले आहे.

सबब, सदरचे प्रकरण गुणवत्तेच्या आधारे निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

CONTROLLER OF RATIONING & D... MUMB...

## <u>युक्तीवाद</u> :-

दिनांक ०३/०१/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. साह पेट्रोलियचे जनरल मॅनेजर श्री. मुरलीधर शानबाग यांनी युक्तीवाद केला की, त्यांचा कंपनीचा पेट्रोलियम पदार्थांचे विविध देशातून आयात करण्याचा व्यवसाय असून त्याकरिता सर्व आवश्यक परवाने त्यांचेकडे असल्याचे सांगितले. त्यांच्या वसई, जिल्हा ठाणे येथील फॅक्टरीमध्ये प्रोसेसिंग करण्याकरिता त्यांनी हायड्रोसॉल २०० बेस ऑईल आयात केल्याचे सांगून सदर आयात केलेला साठा हा बोटीमध्ये असल्याने त्या क्लिअरिंगच्या प्रक्रियेकरिता मे. ऑल इंडिया क्लेअरिंग अॅण्ड फॉरवर्डिंग प्रा.लि. यांची नेमणूक करण्यात आली असून सदर साठ्याचे बंदरातून विरार येथील फॅक्टरीमध्ये पोहच करण्याच्या

वाहतूकीकरिता मे. विकास बॅल्क करिअॅर्स या वाहतूकदारास कराराबध्द करण्यात आले आहे. सदरचा साठा त्यांच्या फॅक्टरीमध्ये विहित वेळेत न पोहचल्याने त्यांनी चौकशी केली असता, त्यांचा टॅंकरमधील बेस ऑईलचा साठा हा चालकाने अनधिकृतरित्या काढीत असताना त्यास पकडले असल्याचे कळ्ले. टॅंकरचा ड्रायव्हर हा गुन्हेगार असल्याने त्यांचा कंपनीचा सदर गुन्ह्याशी काही संबंध नसल्याचे सांगून मे. भगवानजी लॉजिस्टिक प्रा.लि. यांच्या अधिपत्त्याखालील टॅंकरचे चालक व मालक यांच्याशी त्यांचा कंपनीचा कोणताही करार झाला नसल्याचे सांगून ते फक्त मे. विकास बल्क कॅरिअर्स यांच्याशी करारबध्द असल्याचे सांगितले. आयात केलेला संपूर्ण साठा हा आवश्यक त्या पुरावादर्शक कागदपत्रांसह वैध असल्याचे सांगून सदर साठ्याची त्यांच्या फॅक्टरीमध्ये प्रोसेसिंगकरिता तात्काळ आवश्यकता आहे. तथापी, साठा जप्त असल्याने त्यांच्या व्यवसायावर परिणाम झाला असून त्यांचे आर्थिक नुकसानही झाले असल्याचे सांगितले. त्यांच्या कंपनीने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ अंतर्गतचा भंग केला नसल्याने टॅंकर क्र. एमएच-०४-डीके-१७९४ मधील १८४९० लिटर हायड्रोसोल २०० बेस ऑईलचा साठा त्यांचा कंपनीस परत करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक ०३/०१/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित टॅंकर क्र. एमएच-०४-डीके-१७९४ चा मालक अलिमुद्दीन अमिनाली यांनी युक्तीवाद केला की, सदर टॅंकर हा त्यांचा मालकीचा असल्याचे सांगून त्या संबंधीचे आवश्यक कागदपत्रे त्यांच्या नावांवर असल्याचे सांगून त्यांचा वाहतूकीचा व्यवसाय असल्याने ते इतरांना पेट्रोलियम पदार्थाच्या वाहतूकीसाठी त्यांचा टॅंकर भाडेतत्त्वावर देत असल्याचे सांगितले. दिनांक ११/११/२०११ रोजी त्यांचा नमूद टॅंकर मे. भगवानगी लॉजिस्टिक प्रा.लि. यांनी हायड्रोसोल २०० बेस ऑईलचा साठा हा मुंबई येथील बंदरामधून उचल करुन मे. साह पेट्रोलियम लि. यांच्या विरार, ता. वसई, जिल्हा ठाणे येथील फॅक्टरीवर पोहच करण्यासाठी भाडेतत्त्वावर घेतला असल्याचे सांगितले. त्यानुसार त्यांनी त्यांच्या टॅंकरचे चालक मोहमद हकीक अब्दुल रज्जाक खान यांना याबाबतच्या सुचना देऊन त्यानुसार चालकाने सदर टॅंकर गोदी येथील बंदरातून भरुन तो नियोजित ठिकाणी वितरणासाठी घेऊन गेल्याचे सांगितले. तद्नंतर सदरहू टॅंकर प्रत्यक्षात उपभोक्त्यांकडे विहित वेळेत न पोहचल्याने त्यांनी चौकशी केली असता, त्यांना कळ्ले की, शिधावाटप यंत्रणेतील अधिकाऱ्यांनी त्यांचा चालकास नमूद टॅंकरमधून ऑईलचा साठा चोरी करत असताना पकडून त्यानंतर चालकास शिधावाटप अधिकाऱ्यांनी पोलिसांच्या स्वाधीन केल्याचे सांगितले. त्यांचा सदर गुन्ह्याशी काहीही संबंध नसून त्यांच्या ड्रायव्हरने हा गुन्हा केला असल्याने टॅंकरचा मालक म्हणून त्यांना जबाबदार धरण्यात येऊ नये, असे सांगितले. मा. सर्वोच्च न्यायालय येथील प्रकरण क्र. सीआरएलजे १३४१ अन्वये वाहनाच्या मालकाचा गुन्ह्यामध्ये संबंध नसल्यास त्यांचे वाहन जप्त करु शकत नसल्याचे सांगून याही प्रकरणीं वाहन मालक म्हणून त्यांचा गुन्ह्यात सहभाग नसल्याचे सांगितले. त्यांचा टॅंकर हा गेल्या दिड महिन्यापेक्षा अधिक कालावधीपासून पोलिस ठाणे येथे उभा असल्याने तो चालू स्थितीत नसल्याने खराब होण्याची शक्यता असल्याचे सांगून सदर टॅंकरवर त्यांचा उदरनिर्वाह अवलंबून असल्याचे सांगितले. त्यामुळे त्यांचा टॅंकर क्र. एमएच-०४-डीके-१७९४ हा सामान्य अटींवर त्यांना परत करण्याची

विनंती करुन त्यामधील हायड्रोसोल २०० बेस ऑईलचा साठा मे. साह पेट्रोलियम लि. यांना परत करण्यास त्यांची कोणतीही हरकत नसल्याचे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक ०३/०१/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. विकास बल्क कॅरिअर्सचे मालक विराग अे. शेट्टी यांनी युक्तीवाद केला की, ते वाहतूकदार असल्याचे सांगून त्यांचा पेट्रोलिय पदार्थाचा वाहतूकीचा व्यवसाय असल्याचे सांगून ते मे. साह पेट्रोलियम लि. या कंपनीसोबत करारबध्द असून नमूद कंपनीचा हायड्रोसोल २०० बेस ऑईलचा साठा गोदी येथील बंदरातून उचल करुन फॅक्टरी येथे पोहच करण्यासाठी करार असल्याचे सांगितले. त्यांच्याकडे आवशयतेनुसार टँकर उपलब्ध नसल्याने त्यांनी सब कॉन्ट्राक्टद्वारे त्यांच्या स्तरावर परस्पर मे. भगवानजी लॉजिस्टीक प्रा.लि. यांची नेमणूक केली असल्याचे सांगितले. त्याअनुषंगाने त्यांनी सब कॉन्ट्राक्टर म्हणून त्यांना पत्रही निर्गमित केल्याचे सांगितले. तद्नंतर सदरहू टँकर प्रत्यक्षात उपभोक्त्यांकडे विहित वेळेत न पोहचल्याने त्यांनी चौकशी केली असता, त्यांना कळ्ले की, शिधावाटप यंत्रणेतील अधिकाऱ्यांनी त्यांचा चालकास नमूद टँकरमधून ऑईलचा साठा चोरी करत असताना पकडून त्यानंतर चालकास शिधावाटप अधिकाऱ्यांनी पोलिसांच्या स्वाधीन केल्याचे सांगितले. सदर टँकरच्या चालकाने गुन्हा केला असल्याचे सांगून त्यांचा कंपनीचा टँकरच्या चालक अथवा मालका बरोबर कोणताही करारनामा झाला नसल्याचे सांगून त्यांचा संबंध फक्त मे. भगनवानजी लॉजिस्टिक प्रा.लि. या कंपनी सोबत असल्याचे सांगितले. मे. साह पेट्रोलियम लि. या कंपनी सोबत ते करारबध्द असल्याने नियमानुसार सदरचा साठा नियोजित ठिकाणी पोहच करण्याची नैतिक जबाबदारी त्यांची असल्याचे सांगून टँकरमधील हायड्रोसोल २०० बेस ऑईलचा साठा हा साठा मालक असलेल्या मे. साह पेट्रोलियम लि. या कंपनीस परत करण्यास त्यांची कोणतीही हरकत नसल्याचे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक ०३/०१/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. भगवानजी झवेरचंद शाहचे मालक भगवानजी झवेरचंद शाह यांनी युक्तीवाद केला की, ते वाहतूकदार असून त्यांचा पेट्रोलियम पदार्थाच्या वाहतूकीचा व्यवसाय असल्याचे सांगितले. मे. विकास बल्क कॅरिअर्स यांची हायड्रोसोल २०० बेस ऑईलच्या साठ्याची गोदी येथील बंदरातून उचल करुन मे. साह पेट्रोलिय लि. यांच्या विरार, तालुका वसई, जिल्हा ठाणे येथील कंपनीत पुरवठा करण्यासाठी सब कॉन्ट्राक्टर म्हणून नेमणूक केल्याचे सांगून याप्रकरणी टँकर क्र. एमएच-०४-डीके-१७९४ हा अलिमुद्दीन अमीन अली यांचा असल्याचे सांगितले. तद्नंतर सदरहू टँकर प्रत्यक्षात उपभोक्त्यांकडे विहित वेळेत न पोहचल्याने त्यांनी चौकशी केली असता, त्यांना कळ्ले की, शिधावाटप यंत्रणेतील अधिकाऱ्यांनी त्यांचा चालकास नमूद टँकरमधून ऑईलचा साठा चोरी करत असताना पकडून त्यानंतर चालकास शिधावाटप अधिकाऱ्यांनी पोलिसांच्या स्वाधीन केल्याचे सांगितले. त्यांचा नमूद गुन्ह्यात कोणताही संबंध नसल्याचे सांगून टँकरच्या चालकाने हा गुन्हा केला असल्याने व सदर चालक हा त्यांच्या अधिपत्त्याखालील नसल्याने त्यांना याप्रकरणी जबाबदार धरण्यात येऊ नये असे सांगितले. त्यांनी सदर पदार्थाच्या वाहतूकीसाठी करार केला असल्याने नियमानुसार सदर साठ्याची नियोजित ठिकाणी पोहच करण्याची नैतिक जबाबदारी त्यांची असल्याचे सांगून टँकरमधील हायड्रोसोल

२०० बेस ऑईलचा साठा हा साठा मालक असलेल्या मे. साह पेट्रोलियम लि. या कंपनीस परत करण्यास त्यांची हरकत नसल्याचे सांगून त्यानुसार सदरहू टँकरही त्याच्या मालकास परत करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक ०३/०१/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित टँकर क्र. एमएच-०४-डीके-१७९४ चा चालक मोहम्मद हकीक अब्दुल रज्जाक खान यांनी युक्तीवाद केला की, तो टँकर क्र. एमएच-०४-डीके-१७९४ चा चालक असून त्याचा टँकर रेशनिंग अधिकाऱ्यांनी चोरीच्या केस मध्ये पकडून वडाळा टी.टी. पोलिस ठाणे येथे दिला आहे. या केसमध्ये गाडी मालक अलिमुद्दीन याचा काहीही संबंध नाही. तसेच मुद्देमालाचे मालक साह पेट्रोलिय. यांचा काहीही संबंध नाही. ते सर्व तो त्याच्या फायद्यासाठी करीत होता. तरी टँकर क्र. एमएच-०४-डीके-१७९४ ही, गाडी मालक अलि मुद्दीन यास व मुद्देमाल साह पेट्रोलियम यास देण्याची विनंती केली आहे, असे नमूद आहे.

वरिष्ठ पोलिस निरिक्षक, वडाळा टी.टी. पोलिस ठाणे यांचे दिनांक ०३/०१/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदनात, यातील अद्यापपर्यंतच्या तपासादरम्यान या गुन्ह्यात वापरण्यात आलेल्या टँकर मालकाचा काहीही सहभाग दिसून येत नाही. त्याचप्रमाणे सदर गुन्ह्यातील मोटार टँकर क्र. एमएच-०४-डीके-१७९४ हा या पोलिस ठाणेच्या ताब्यात असून सदर वाहनातील तेलाचे नमुने रासायनिक विश्लेषणासाठी पाठविण्यात आलेले असून सदर वाहनातील तेल हे ज्वलनशिल असल्याने सदर गुन्ह्याच्या तपासासाठी सदर वाहनाची किंवा वाहनातील तेलाची या पोलिस ठाणेस गरज नाही. तरी सदर मालमत्तेच्या विल्हेवाटी संबंधी आपण नियमाप्रमाणे व कायद्याच्या तरतुदीप्रमाणे योग्य तो निर्णय घेण्यास विनंती केली आहे.

ऑल इंडिया क्लिअरींग ॲण्ड फॉरवर्डींग प्रायव्हेट लिमिटेड यांचे दिनांक ०३/०१/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदनात, त्यांचा आयात केलेल्या साठ्याची क्लिअरिंग ॲण्ड फॉरवर्डिंगची जबाबदारी असल्याचे सांगून ते त्यानुसार आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करुन गोदीतून आयात केलेला साठा क्लिअरिंग करण्याची त्यांची जबाबदारी असल्याचे सांगितले. मे. साह पेट्रोलियम लि. या कंपनीने त्यांना हायड्रोसोल २०० बेस ऑईल या आयात केलेल्या साठ्याच्या क्लिअरिंग करिता नेमणूक केली असल्याचे सांगून त्यांना आयातदाराकडून कळले की, सदर साठ्याची टँकरमधून वाहतूकीसाठी वाहतूकदारास नेमले असून तद्नंतर त्यांना सदर साठ्याबाबत काहीही माहिती असल्याचे सांगून त्यांचे काम क्लिअरिंग पूरता मर्यादित असल्याचे सांगितले. त्यांचा वाहतूकदार अथवा त्याचा चालक यांच्याशी काहीही संबंध नसल्याचे सांगून सदर बेस ऑईलचा साठा हा मे. साह पेट्रोलियम लि. या साठा मालकास परत करण्यास त्यांची काहीही हरकत नसल्याचे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

## <u>निष्कर्ष :-</u>

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, दिनांक ११/११/२०११ रोजी या कार्यालयाच्या फिरत्या पथकास मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार येथील अधिकारी/कर्मचारी दोन पंचासह आयमॅक्स टॉकीज, वडाळा ट्रक टर्मिनस येथे रस्त्याच्या बाजूला एक ट्रक ट्रेलरच्या अडोशाला एक इसम गाडीच्या मागील बाजूस संशयास्पदरीत्या उभा असलेला काहीतरी हालचाल करत असल्याचे पथकास दिसला. त्याप्रमाणे पथकाने धावत-धावत जाऊन सदर व्यक्तीस ताब्यात घेतले. त्यावेळी टँकर क्र. एमएच-०४-डीके-१७९४ यामधून सदर इसमाने चोरीने नळ्यांच्या सहाय्याने अंदाजे २२० लिटर क्षमतेच्या लोखंडी ड्रममध्ये पेट्रोलजन्य सदृश्य पदार्थ अंदाजे २०० लिटर काढले असल्याचे पथकास निदर्शनास आले. त्यानंतर सदर इसमास अधिकाऱ्यांनी त्याचे नांव विचारले असता, त्याने त्याचे नांव हकीक खान तसेच त्याच्या वडिलांचे नांव अब्दुल रज्जाक खान असे सांगितले. पथकातील अधिकाऱ्यांनी पंचासह गाडीचे कागदपत्र, ड्रायव्हींग लायसन्स, गाडीची चावी तसेच गाडीमध्ये भरलेल्या पेट्रोलियम पदार्थाच्या चलनाबाबतचे कागदपत्र मागितले. त्यानुसार ड्रायव्हरने कागदपत्र अधिकाऱ्यांच्या ताब्यात दिले. सदर कागदपत्रांमध्ये ऑल इंडिया क्लिअरींग ॲण्ड फॉरवर्डींग प्रायव्हेट लिमिटेड, पत्ता ३०२, व्यापत भवन, ४९ पी-डेमेलो रोड, कर्नाक बंदर, मुंबई ४००००९ चे चलन क्रमांक ०६३४१० दि.११/११/२०११ रोजी भरलेले हायड्रोसोल - २०० बेस ऑईल असे चलन आढळले. ते मे. शाह पेट्रोलियम लि. प्लॉट नं. ५ ते १०, शाह इंडस्ट्रीयल इस्टेट, गाव - विरार, ता. वसई, जिल्हा ठाणे (महाराष्ट्र) येथे जाणार असल्याचे चलन आढळले. सदर चलन प्रमाणे गाडीमध्ये नेट वजन १८६९० असे नमूद असलेले आढळले. टँकर क्र. एमएच-०४-डीके-१७९४ या टँकरमधून सदर इसम चोरीने हायड्रोसोल - २०० बेस ऑईल २२० लिटर क्षमतेच्या लोखंडी ड्रममध्ये काढत असल्याची अधिकाऱ्यांची तसेच उपस्थित पंचाची खात्री झाली. त्यानंतर अधिकारी वर्ग सदर कागदपत्रांची पहाणी करत असताना अधिकाऱ्यांच्या नकळत अंधाराचा फायदा घेऊन सदर व्यक्ती तेथून निघून गेली. अधिकाऱ्यांना सदर बाब लक्षात येताच अधिकाऱ्यांनी सदर व्यक्तीचा शोध आजूबाजूच्या ठिकाणी घेण्याचा प्रयत्न केला. परंतू रात्रीची वेळ व असलेला अंधार तसेच सदर विभागात पार्कींग केलेले टँकर व ट्रेलर या अडचणीमुळे सदर व्यक्ती सापडू शकली नाही. म्हणून त्यानंतर अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष सदर गाडी ताब्यात घेऊन सदर ठिकाणी पंचनामा केला. दरम्यानच्या काळात अधिकाऱ्यांनी १०० क्रमांकावर सदर घटनेची माहिती दिली असता वडाळा ट्रक टर्मिनल पोलिस ठाणे, मुंबई ४०००३७ येथील श्री. वाय.एन. लावण, ए.एस.आय. व श्री. विलास रामचंद्र भोगले पोलिस नाईक बक्कल क्र. २०० हे हजर झाले. पथकातील अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष सदर पोलिस अधिकाऱ्यांना घटनेची माहिती सांगून जप्त केलेल्या मुद्देमालाची माहिती दिली. त्यानंतर सदर मुद्देमालासह अधिकारी वर्ग व पंच वडाळा ट्रक टर्मिनल पोलिस ठाणे, मुंबई - ३७ या पोलिस ठाणेकडे रवाना होऊन जप्त मुद्देमालासह हजर झाले. सदर जप्त मुद्देमाल व चालकाकडून प्राप्त झालेले गाडी संबंधीचे तसेच हायड्रोसोल २०० बेस ऑईल भरल्यासंबंधीचे कागदपत्रे, सदर चालकाचे ड्रायव्हींग लायसन्स व जप्त मुद्देमालाचा नमुना क्र. अ-३ पोलिसांच्या स्वाधीन केले. तसेच जप्त टँकर क्र. एमएच-०४-डीके-१७९४ सह त्याची

चावीही पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आली. अशाप्रकारे घटनास्थळी अधिकाऱ्यांनी सदर १ टँकर, हायड्रोसोल २०० बेस ऑईलचा साठा व इतर मुद्देमाल जप्त करुन संबंधितांविरुध्द गुन्हा नोंद केला आहे.

सुनावणीस उपस्थित मे. साह पेट्रोलियचे जनरल मॅनेजर श्री. मुरलीधर शानबाग यांनी केलेल्या खुलाशात, त्यांच्या वसई, जिल्हा ठाणे येथील फॅक्टरीमध्ये प्रोसेसिंग करण्याकरिता त्यांनी हायड्रोसॉल २०० बेस ऑईल आयात केल्याचे सांगून सदर आयात केलेला साठा हा बोटीमध्ये असल्याने त्या क्लिअरिंगच्या प्रक्रियेकरिता मे. ऑल इंडिया क्लेअरिंग ॲण्ड फॉरवर्डिंग प्रा.लि. यांची नेमणूक करण्यात आली असून सदर साठ्याचे बंदरातून विरार येथील फॅक्टरीमध्ये पोहच करण्याच्या वाहतूकीकरिता मे. विकास बॅल्क करिॲर्स यांची वाहतूकदार म्हणून नेमणूक केली असल्याचे सांगून संदरचा साठा त्यांच्या फॅक्टरीमध्ये विहित वेळेत न पोहचल्याने त्यांनी चौकशी केली असता, त्यांचा टँकरमधील बेस ऑईलचा साठा हा अनधिकृतरित्या काढीत टँकर चालकास पकडले असल्याचे सांगितले. टँकरचा ड्रायव्हर हा गुन्हेगार असूनं त्यांच्या कंपनीचा सदर गुन्ह्याशी काही संबंध नसल्याचे सांगून मे. भगवानजी लॉजिस्टिक प्रा.लि. यांच्या अधिपत्त्याखालील टँकरचे चालक व मालक यांच्याशी त्यांचा कंपनीचा कोणताही करार झाला नसल्याचे सांगून ते फक्त मे. विकास बल्क कॅरिअर्स यांच्याशी करारबध्द असल्याचे सांगितले. आयात केलेला संपूर्ण साठा हा आवश्यक त्या पुरावादर्शक कागदपत्रांसह वैध असल्याचे सांगून त्यांच्या कंपनीने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चा भंग केला नसल्याने टँकर क्र. एमएच-०४-डीके-१७९४ मधील १८४९० लिटर हायड्रोसोल २०० बेस ऑईलचा साठा त्यांचा कंपनीस परत करण्याची विनंती केली आहे.

प्रस्तूत गुन्ह्यात जप्त करण्यात आलेला टँकर क्र. एमएच-०४-डीके-१७९४ मधील हायड्रोसोल २०० बेस ऑईलचा साठा हा मे. सहा पेट्रोलियम लि. यांनी त्यांच्या मालकीचा असल्याचे सांगून सदर साठ्याच्या पुराव्यार्थ त्यांनी बिल ऑफ एन्ट्री क्र. ५१२३५१६ दिनांक ०८/११/२०११ सादर केल्याचे आढळून आले आहे. सदर बिल ऑफ एन्ट्रीचे अवलोकन करता, मे. सहा पेट्रोलियम लि. यांनी हायड्रोसोल २०० बेस ऑईलचा ७८१.९१८ मे. टन साठा हा हॉस्टन पोर्ट, युनायटेड स्टेटस् या देशातून बिल ऑफ लेडिंग क्र. २३० दिनांक २२/०९/२०११ अन्वये आयात केल्याचे दिसून येते. त्याअनुषंगाने मे. सहा पेट्रोलियम लि. यांनी आयात केलेल्या साठ्याचे कमर्शिअल इन्व्हाईस, पॅकिंग लिस्ट, सर्टिफिकेट ऑफ ओरिजिन, क्वालिटी व क्वांटिटी सर्टिफिकेटच्या छायांकित प्रतिही सादर केल्या आहेत. तसेच संचालक, न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा यांच्याकडून प्राप्त झालेल्या अहवालात, It may be used as base oil hydrosol असे नमूद केले आहे. यावरुन मे. सहा पेट्रोलियम लि. यांचा टँकर क्र. एमएच-०४-डीके-१७९४ मधील जप्त करण्यात आलेला हायड्रोसोल २०० बेस ऑईलचा साठा हा उपलब्ध केलेल्या आयात संबंधीच्या व इतर कागदपत्रांचे अवलोकन करता वैध असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. सबब, जप्त करण्यात आलेला टँकरमधील संपूर्ण हायड्रोसोल २०० बेस ऑईलचा साठा हा मे. सहा पेट्रोलियम लि. या कंपनीस क्षतीपुर्ती बंधपत्र घेऊन परत करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी, मे. सहा पेट्रोलियम लि. यांचे वतीने केलेल्या खुलाशात, त्यांच्या कंपनीने मे. विकास बल्क कॅरिअर्स यांची वाहतूकदार म्हणून नेमणूक केली असल्याचे सांगितले. तथापी, मे. विकास बल्क कॅरिअर्स या कंपनीने सदर कामी वाहतूकीसाठी करारबध्द असताना त्यांनी परस्पर त्यांच्या स्तरावर बेजबाबदारपणे पुरेसे टँकर उपलब्ध नसल्याच्या सबबीवरुन विनाकरारनामा सब कॉन्ट्रॅक्टर म्हणून मे. भगवानजी झवेरचंद शाह यांची नियुक्ती केल्याचे दिसून येते. यावरुन मे. विकास बल्क कॅरिअर्स या वाहतूकदाराने मे. सहा पेट्रोलियम लि. या कंपनीची विश्वासार्हता गमावल्याचे निष्पन्न होत आहे. तद्नंतर मे. भगवानजी झवेरचंद शाह यांनी सदर साठ्याच्या वाहतूकीकरिता परस्पर त्यांच्या स्तरावर अलिमुद्दीन अमीन अली या टँकर मालकास प्राधिकृत केल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. जप्त करण्यात आलेल्या टँकर क्र. एमएच-०४-डीके-१७९४ या टँकरचे मालक अलिमुद्दीन अमीन अली यांनी सुनावणीमध्ये केलेल्या खुलाशात, दिनांक ११/११/२०११ रोजी त्यांचा नमूद टँकर मे. भगवानगी लॉजिस्टिक प्रा.लि. यांनी हायड्रोसोल २०० बेस ऑईलचा साठा हा मुंबई येथील बंदरामधून उचल करुन मे. साह पेट्रोलियम लि. यांच्या विरार, ता. वसई, जिल्हा ठाणे येथील फॅक्टरीवर पोहच करण्यासाठी भाडेतत्त्वावर घेतला असल्याचे सांगितले. त्यानुसार त्यांनी त्यांच्या टँकरचे चालक मोहमद हकीक अब्दुल रजाक खान यांना याबाबतच्या सुचना देऊन त्यानुसार चालकाने सदर टँकर गोदी येथील बंदरातून भरुन तो नियोजित ठिकाणी वितरणासाठी घेऊन गेल्याचे सांगितले. तद्नंतर सदरहू टँकर प्रत्यक्षात उपभोक्त्यांकडे विहित वेळेत न पोहचल्याने त्यांनी चौकशी केली असता, त्यांना कळले की, शिधावाटप यंत्रणेतील अधिकाऱ्यांनी त्यांचा चालकास नमूद टँकरमधून ऑईलचा साठा चोरी करत असतांना पकडून त्यानंतर चालकास शिधावाटप अधिकाऱ्यांनी पोलिसांच्या स्वाधीन केल्याचे सांगितले. वास्तविक पाहता टँकर क्र. एमएच-०४-डीके-१७९४ च्या चालकाने सदरचा साठा भरुन नियोजित ठिकाणी न जाता वडाळा ट्रक टर्मिनस येथे घटनास्थळी जाऊन नमूद टँकरमधील बेस ऑईलचा साठा हा अनधिकृतरित्या काढीत असतांना पथकाने रंगेहात पकडले आहे. यासर्व घटनाक्रमाचे अवलोकन करता, वाहतूकदार कंपनी, सब कॉन्ट्रॅक्टर व टँकर मालक या सर्वांनी वाहतूकीची जबाबदारी पार पाडतांना अक्षम्य निष्काळजीपणा दाखवून टँकर चालकास जबाबदार धरले आहे. जप्त टँकर क्र. एमएच-०४-डीके-१७९४ मधील हायड्रोसोल २०० बेस ऑईलचा साठा प्रत्यक्षात उपभोक्त्यास न देता स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी गैरमार्गाने सदर टँकरमधील हायड्रोसोल २०० बेस ऑईलचा साठा टँकर चालकाने काढल्याचे आढळून आल्याने या गैरकृत्यास अप्रत्यक्षरित्या मे. विकास बल्क कॅरिअर्स, सब कॉन्ट्रॅक्टर मे. भगवानजी झवेरचंद शाह व टँकर मालक हेही जबाबदार असल्याने त्यांनी उपभोक्ता तसेच पर्यायाने शासनाची फसवणूक केल्याचे सिध्द होत आहे. नमुद टँकरमधील भरण्यात आलेला हायड्रोसोल २०० बेस ऑईलचा साठा हा नियोजीत ठिकाणी व जसाच तसा वितरण करण्याची जबाबदारी वाहतूकदार व टँकरचे मालक यांची आहे. प्रस्तुत प्रकरणी टँकर मालकाच्या अपरोक्ष जरी चालक यांने त्यांचे वाहनाचा गैरवापर केला असला तरी वाहन मालक या नात्याने त्यांनी त्यांचे वाहनाचा गैरवापर होणार नाही याची सर्वतोपरी दक्षता घेणे आवश्यक आहे. सबब, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ)(क) मधील तरतुदीनुसार सदर टँकरच्या



CONTROLLER OF RATIONING ... HEAD ... MUM

बाजारमुल्या एवढी संपुर्ण रक्कम भरण्यास टँकरचा मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचा टँकर त्यांच्या मालकास परत करण्याचा अथवा टँकरचे मालक तेवढी रक्कम भरण्यास तयार नसल्यास पोलिसांनी सदरचा टँकर जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी धाडीच्या वेळी घटनास्थळी आढळून आलेले २२० लिटर क्षमतेचा लोखंडी ड्रम, २० लिटर क्षमतेचा एक सफेद रिकामी कॅन, एक प्लॅस्टिकचे नरसाळे, एक प्लॉस्टिकचा २० लिटर क्षमतेचा रिकामा गोल ड्रम, एक २०/२२ चा लोखंडी पाना, एक लोखंडी नळ इ. शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई मला जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये वडाळा टी. टी. पोलिस ठाणे, वडाळा येथे स्थानिक गुन्हा नोंद क्र. ३८४/२०११, दिनांक १२/११/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

## आदेश :-

१) प्रस्तूत प्रकरणी, जप्त करण्यात आलेल्या टँकरमधील संपुर्ण हायड्रोसोल २०० बेस ऑईलचा साठा हा मे. सहा पेट्रोलियम लि. या कंपनीस पोलीसांनी क्षतीपुर्ती बंधपत्र घेऊन परत करावा.

२) जप्त करण्यात आलेला टँकर क्र. एमएच-०४-डीके-१७९४ हा शासनजमा करण्यात येत आहे. सदर वाहनाच्या बाजारमुल्या एवढी संपुर्ण रक्कम भरण्यास वाहनाचा मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचे वाहन त्याच्या मालकास परत करण्यात यावे व सदर रक्कम शासनजमा करावी. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी वाहनाच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

३) अथवा वाहनाचा मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या वाहनाची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरचे वाहन लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

४) जप्त करण्यात आलेले २२० लिटर क्षमतेच्या लोखंडी ड्रममधील २०० लिटर हायड्रोसोल २०० बेस ऑईलचा साठा हा शासनजमा करण्यात यावा. सदर साठ्याची पोलीसांनी सद्याच्या प्रचलित दरानुसार वैध परवानाधारकांस विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

५) घटनास्थळी जप्त करण्यात आलेला २२० लिटर क्षमतेचा लोखंडी ड्रम, २० लिटर क्षमतेचा एक सफेद रिकामा कॅन, एक प्लॅस्टिकचे नरसाळे, एक प्लॉस्टिकचा २० लिटर क्षमतेचा रिकामा गोल ड्रम, एक २०/२२

चा लोखंडी पाना, एक लोखंडी नळ इ. वस्तू शासनजमा करण्यात यावी. सदर वस्तूंची पोलिसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) टँकर क्र. एमएच-०४-डीके-१७९४ चा चालक मोहम्मद हकीक अब्दुल रज्जाक खान
२) टँकर क्र. एमएच-०४-डीके-१७९४ चा मालक
३) ऑल इंडिया क्लिअरींग ॲण्ड फॉरवर्डींग प्रायव्हेट लिमिटेडचे मालक
४) मे. शाह पेट्रोलियम लि.चे मालक
५) मे. भगवानजी झवेरचंद शाह, ट्रान्सपोर्ट कान्ट्रॅक्टर
६) मे. विकास बल्क कॅरिअरसचे मालक

(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वडाळा टी. टी. पोलिस ठाणे, वडाळा यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, वडाळा टी. टी. पोलिस ठाणे, वडाळा यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
३) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, का.क्र. ५, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव
४) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

D:\user E\Amaldata-2012\Ammal Aadesh\Aadesh.doc

001